navbharat
Mega Developers

# DHARAVI COMPILED MEDIA REPORT
## 17 Jul, 2025 - 18 Jul, 2025

## Total Mention 57

| Print | Financial | Mainline | Regional | Periodical |
|---|---|---|---|---|
| 15 | N/A | 2 | 13 | N/A |

| Tv | Business | English | Hindi | Regional |
|---|---|---|---|---|
| N/A | N/A | N/A | N/A | N/A |

| Online |
|---|
| 42 |

## Print

| No | Newspaper | Headline | Edition | Pg |
|---|---|---|---|---|
| 1. | The Times of India | We are helping Marathi manoos return to Mumbai, says Shinde | Mumbai | 4 |
| 2. | The Indian Express | Uproar over Shinde remark on 'corruption in BMC | Mumbai | 6 |
| 3. | Sakal | Will bring back Marathi people who have gone abroad | Pune | 2 |
| 4. | Sakal | Skill development lessons for youth in Dharavi | Mumbai | 5 |
| 5. | Nav Rashtra | Mumbaikars who have gone abroad will be brought back | Pune | 5 |
| 6. | Nav Rashtra | Mumbaikars who have left will be brought back | Mumbai | 7 |
| 7. | Prahar | Mumbai's makeover | Mumbai | 7 |
| 8. | Mumbai Tarun Bharat | Symbiosis' ready for skill development of students in Dharavi | Mumbai | 7 |
| 9. | Mumbai Tarun Bharat | If Dino opens his mouth, many will become 'Moriya'; Eknath Shinde attacks 'Ubatha | Mumbai | 1 |
| 10. | Navbharat Times | Symbiosis University. Partnership between DRP | Mumbai | 2 |
| 11. | Mumbai Chauffer | Will bring back Marathi people who have left Mumbai | Mumbai | 1,6 |
| 12. | Mumbai Chauffer | Symbiosis ready for skill development of Dharavi residents | Mumbai | 5 |
| 13. | Mumbai Mirror | Dharavi residents question survey | Mumbai | 1,4 |
| 14. | Divya Bhaskar | Partnership with Symbiosis for skill development of Dharavi graduates | Mumbai | 1 |
| 15. | Navshakti | Affordable houses will be built in Mumbai. | Mumbai | 3 |

The Times of India • 18 Jul • Dharavi

We are helping Marathi manoos return to Mumbai, says Shinde

| 4 • PG | 189 • Sqcm | 1066213 • AVE | 2.74M • Cir | Middle Left |
|---|---|---|---|---|

Mumbai

# We are helping Marathi manoos return to Mumbai, says Shinde

Priyanka.Kakodkar
@timesofindia.com

**Mumbai:** With BMC polls approaching and talk of the Thackeray cousins coming together, deputy chief minister Eknath Shinde on Thursday focused on Marathi voters in the city. In his speech in the state assembly, he claimed that the Mahayuti govt was helping the Marathi manoos return to the city.

Speaking about the state's efforts to restart stalled redevelopment projects, he said, "Marathi people have to leave the city and move to distant suburbs like Vasai and Nalasopara. Many are stuck in transit camps for years. These homes will help Marathi people return to Mumbai."

He attacked Shiv Sena (UBT) chief Uddhav Thackeray, saying, "They need to think about why the Marathi manoos was thrown out of Mumbai. They think of Marathi people only during elections. Then they ask, who are you?"

While replying to the Opposition's debate against the govt, Shinde said, "We cleared 21 cluster development projects. We are involving state undertakings like Mhada, SRA, and MMRDA to do joint ventures with developers to revive stalled projects."

Shinde spoke of the govt's efforts for the redevelopment of BDD chawl in Worli, which has 15,600 residents who are mainly Marathi. He also spoke about the govt's efforts to provide housing for mill workers, who are also sons of the soil. "So far, we gave homes to 13,161 mill workers in the city," said Shinde. He spoke of redevelopment efforts at Abhyudaya Nagar, Motilal Nagar, Kamathipura and Patra chawl.

On the Dharavi Redevelopment Project (DRP), he said, "It is wrong to say the govt is giving land to Adani. The govt also has a share in the DRP. Those who criticise the project—my question is, do they want locals to continue to live in poor conditions?"

Referring to the Mithi river desilting scam, Shinde alleged those who are targeting Dino Morea could soon face the music. "Who was the contractor in the case? They see Dino Morea. But if he opens his mouth, then many people will become Morya," he said. In order to aid redevelopment of buildings in the airport's funnel zone, he said the govt took a decision to allow base plus intentional FSI. "This will help attract builders for redevelopment projects."

The Indian Express • 18 Jul • Dharavi

Uproar over Shinde remark on 'corruption in BMC

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 6 • PG | 275 • Sqcm | 789239 • AVE | 625K • Cir | Top Right |

Mumbai

# Uproar over Shinde remark on 'corruption in BMC'

**EXPRESS NEWS SERVICE**
MUMBAI, JULY 17

THE MAHARASHTRA Assembly on Thursday descended into chaos after Deputy Chief Minister Eknath Shinde launched a scathing attack on the erstwhile Shiv Sena-led administration over alleged corruption in the BMC, sparking protests from the opposition Shiv Sena (UBT) and a 10-minute adjournment. Besides, the Opposition was also upset over the fact that Sena UBT party leader Bhaskar Jadhav was denied an opportunity to reply.

Replying to a debate under Rule 293 on urban development and housing, Shinde — who also holds the urban development portfolio — said the Mahayuti government had accelerated stalled redevelopment projects in Mumbai and promised that the "Marathi manoos" who had left the city due to lack of affordable housing would now return. He announced the clearance of 21 cluster redevelopment schemes and assured completion of several long-pending projects in partnership with



**Shiv Sena (UBT) leader Aaditya Thackeray arrives at Vidhan Bhavan in Mumbai on Thursday.** *Ganesh Shirsekar*

state-run utilities.

Referring to the Dharavi Redevelopment Project (DRP), Shinde rejected criticism about private control being given to Adani group, saying the state government was actively involved through the Slum Rehabilitation Authority and dismissed claims that the Adani Group had been handed the project without safeguards. He also announced an online portal for pothole-related complaints and incentives for redevelopment in airport funnel zones.

However, his sharp remarks accusing the previous BMC administration — controlled by Uddhav Thackeray's Sena — of large-scale irregularities triggered a furore from the Opposition benches.

After Shinde's speech, Sena (UBT) MLA Bhaskar Jadhav rose to respond but was denied the




opportunity by Speaker Rahul Narwekar, who maintained that only Aaditya Thackeray, who had initiated the debate, could exercise the right to reply — and he was not present in the House at the time.

The decision led to loud protests from the Opposition, with Sena (UBT) members accusing the Speaker of bias and siding with the ruling alliance. Amid the din, the Speaker adjourned the House for 10 minutes.

When proceedings resumed, Cabinet Minister Shambhuraj Desai (Shiv Sena) and Shinde objected to the alleged gestures made by Jadhav and Thackeray towards the Chair. Shinde also accused Jadhav of daring the Speaker to suspend him — calling it "unacceptable conduct."

Ajay Chaudhari, leader of the Sena (UBT) in the Assembly, defended his colleague, arguing that the right to reply was not restricted to a single member and that Thackeray had momentarily stepped out due to official commitments.

Outside the House, Jadhav accused the Speaker of acting like a government functionary. "The Speaker has abandoned neutrality. He denied the Opposition the basic right to reply. Shinde's speech was full of falsehood, and we were not allowed to counter it," he said, alleging that several critical issues, including civic concerns in Thane and other cities, education, anganwadis, and water supply, were ignored in Shinde's response.

Outside the house, Aaditya Thackeray further criticised Shinde and challenged him for a one-hour public debate on the working of the urban development department. "I will ask pointed questions, and I expect straight answers," he told reporters, calling Shinde "ungrateful and shameless," and accusing him of betraying the very party that gave him political space and position.

Sakal • 18 Jul • Dharavi

# Will bring back Marathi people who have gone abroad

| 2 • PG | 167 • Sqcm | 600548 • AVE | 2.89M • Cir | Middle Center |
|---|---|---|---|---|

Pune

# मुंबईबाहेर गेलेल्या मराठी माणसांना परत आणणार

## उपमुख्यमंत्री शिंदे : रखडलेल्या पुनर्विकास प्रकल्पांना अधिक गती

''मुंबई महानगरातील सर्वसामान्यांचे घरांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी गेल्या अनेक वर्षांपासूनचे अडथळे दूर करीत मुंबईबाहेर गेलेल्या मराठी माणसांना परत आणण्याचा आमचा निर्धार आहे. नगरविकास आणि गृहनिर्माण विभागातील आवश्यक त्या सुधारणांमुळे रखडलेले पुनर्विकास प्रकल्प पूर्ण होऊन झोपडपट्टीमुक्त मुंबईच्या दिशेने वाटचाल होईल,'' असा विश्वास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गुरुवारी विधानसभेत व्यक्त केला.

विधानसभेत नियम २९३ अन्वये झालेल्या चर्चेला उत्तर देताना ते म्हणाले, ''मुंबईला जगाशी जोडण्याचे काम आम्ही करत आहोत. मुंबईचा चेहरामोहरा बदलण्याचे काम खऱ्या अर्थाने आम्ही करत आहोत.

मुंबईतील रखडलेल्या पुनर्विकास प्रकल्पांना गती देण्याचे काम सरकार करीत आहे. यामध्ये मोतीलाल नगर गोरेगाव, जीटीबीनगर येथे समूह विकास प्रकल्पासाठी विकासकाची नेमणूक करण्यात आली आहे. यामुळे चार हजार ९०० रहिवाशांना घरे मिळणार आहेत. कामाठीपुरा अभ्युदयनगर, आदर्शनगर वरळी आणि वांद्रे रेक्लमेशन, वरळी नायगाव आणि ना.म. जोशी मार्ग येथे बीडीडी चाळ, रमाबाई आंबेडकर नगर झोपडपट्टीचे पुनर्वसन अशी कामे करण्यात येणार आहेत.''



### धारावीचा पुनर्विकास 'स्मार्ट मुंबई'च्या दिशेने

- ''धारावीतल्या प्रत्येकाचे पुनर्वसन करण्यात येणार आहे. एकूण ७२ हजार कुटुंबांचे पुनर्वसन होणार असून हा पुनर्विकास फक्त पायाभूत सुविधांचा नाही, तर रोजगार, शिक्षण, आरोग्य, आणि सामाजिक सलोख्याचे मॉडेल ठरेल. हे 'स्मार्ट मुंबई'च्या दिशेने उचललेले ऐतिहासिक पाऊल आहे,'' असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

### शिंदे म्हणाले...

- परवडणारी ३५ लाख घरे बांधणार
- खड्ड्यांच्या तक्रारीसाठी ऑनलाइन पोर्टल
- 'आपला दवाखाना'साठी ११०६ कोटी रुपये

Deputy CM Shinde pledged to rehabilitate 3,000 families in Dharavi, aiming to revive Marathi residents who left Mumbai. He called the redevelopment a historic step toward a 'Smart Mumbai,' focusing on infrastructure, employment, education, health, and social harmony, with the government accelerating redevelopment projects.

Sakal • 18 Jul • Dharavi

## Skill development lessons for youth in Dharavi

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 5 • PG | 40 • Sqcm | 26432 • AVE | 352.42K • Cir | Bottom Left |

Mumbai

### धारावीतील तरुणांना कौशल्य विकासाचे धडे

मुंबई : धारावीतील तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात म्हणून सिम्बायोसिस मुक्त शिक्षण सोसायटी आणि नवभारत मेगा डेव्हलपर्स प्रायव्हेट लिमिटेड (एनएमडीपीएल) यांच्या भागीदारीतून विशेष उपक्रम सुरू करण्यात येत आहे. त्यामुळे येथील पदवीधर आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना कौशल्य प्रशिक्षणाची संधी उपलब्ध होणार आहे. 'सिम्बायोसिस कौशल्य आणि व्यवसाय विद्यापीठा'च्या वतीने धारावीतील तरुणांसाठी चार महिन्यांचा विशेष अभ्यासक्रम तयार केला आहे. प्रशिक्षणादरम्यान विद्यार्थ्यांना फायनान्शियल ॲनालिस्ट, बिझनेस ॲनालिस्ट, एचआर एक्झिक्युटिव्ह, लॉजिस्टिक को-ऑर्डिनेटर अशा नोकऱ्यांसाठी तयार केले जाणार आहे.

Mumbai's Dharavi youth will get job opportunities through skill development courses launched by Symbiosis Free Education Society and Navbharat Mega Developers. Symbiosis Skill and Business University has designed a four-month program to train graduates and postgraduates for roles like Financial Analyst, HR Executive, Business Analyst, and Logistics Coordinator.

Nav Rashtra • 18 Jul • Dharavi

## Mumbaikars who have gone abroad will be brought back

| 5 • PG | 171 • Sqcm | 164478 • AVE | 860K • Cir | Top Left |
|---|---|---|---|---|

Pune

### परवडणारी ३५ लाख घरे बांधण्याचा राज्य सरकारचा संकल्प-उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

# बाहेर गेलेल्या मुंबईकराला परत आणणार

मुंबई, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. मुंबईतला मुंबईकर सध्या शहराबाहेर फेकला गेला आहे. या सर्वसामान्य मुंबईकराचे घरांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी गेल्या अनेक वर्षांपासूनचे अडथळे दूर करीत मुंबईबाहेर गेलेल्या मराठी माणसांना परत आणण्याचे काम आम्ही करत आहोत. याशिवाय महायुती सरकारने केलेल्या प्रयत्नांमुळे देशाचे ग्रोथ इंजिन असलेल्या मुंबईतील नागरिकांच्या जीवनात आमुलाग्र बदल होईल. नगरविकास आणि गृहनिर्माण विभागातील आवश्यक त्या सुधारणांमुळे रखडलेले पुनर्विकास प्रकल्प पूर्ण होतील तसेच झोपडपट्टीमुक्त मुंबईच्या दिशेने वाटचाल होईल, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधानसभेत दिली.

विधानसभेत नियम २९३ अन्वये झालेल्या चर्चेला उत्तर देताना उपमुख्यमंत्री शिंदे बोलत होते. शिंदे म्हणाले, मुंबईचा मेकओव्हर खऱ्या अर्थाने आम्ही करतोय. मुंबईसाठी सर्वाधिक काम महायुतीने केलंय.



### वरळीमध्ये ५५६ सदनिकांचे वाटप १५ ऑगस्टपर्यंत

मुंबईतील रखडलेल्या पुनर्विकास प्रकल्पांना गती देण्याचे काम आम्ही करीत आहोत. यामध्ये मोतीलाल नगर गोरेगाव, जीटीपी नगर येथे समूह विकास प्रकल्पासाठी विकासकाची नेमणूक करण्यात आली आहे. यामुळे ४९०० रहिवाशांना घरे मिळणार आहेत. कामाठीपुरा अभ्युदयनगर इथल्या समूह विकासासाठी निविदा प्रक्रिया सुरू असून सप्टेंबर २०२५पर्यंत ती पूर्ण होईल. ११ हजार ४११ भाडेकरूंना पुनर्विकासाचा लाभ होणार आहे. आदर्शनगर वरळी आणि वांद्रे रिक्लेमेशन येथे क्लस्टरचा लाभ २०१० रहिवाशांना होणार आहे त्याचीही निविदा प्रक्रिया सुरू आहे. वरळी नायगाव आणि ना.म. जोशी मार्ग येथे बीडीडी चाळीचा पुनर्विकास प्रकल्प सुरू आहे.

० २५ टक्के सदनिकांचे वाटप डिसेंबर २०२५ पर्यंत

**४९००** रहिवाशांना मिळणार घरे

**११४११** भाडेकरूंना पुनर्विकासाचा लाभ

- वरळी, वांद्रे रिक्लेमेशन येथे २०१० रहिवाशांना क्लस्टरचा लाभ
- वरळी, नायगाव आणि ना.म. जोशी मार्ग येथे बीडीडी चाळीचा पुनर्विकास

### गिरणी कामगारांच्या घरांसाठी हौसिंग स्टॉक वाढवणार

गिरणी कामगारांनी मुंबईच्या विकासासाठी मोठा त्याग केला आहे. आम्ही गिरणी कामगारांना मुंबईलगत घरे बांधून देणार आहोत. मुंबई बाहेर गेलेल्या गिरणी कामगारांना आम्ही मुंबईत आणतोय. गिरणी कामगारांचे सर्वेक्षण करण्यासाठी आम्ही ॲप तयार केले. मुंबईतल्या आजारी, बंद पडलेल्या गिरण्यांमधल्या १ लाख ७४ हजार १७२ गिरणी कामगारांची नोंद झाली. यापैकी २८ गिरण्यांच्या जागांवर बांधकाम पूर्ण करून घरांच्या सोडती चार टप्प्यात म्हाडाकडून काढण्यात आल्या आहेत. आतापर्यंत १३ हजार १६१ गिरणी कामगारांना घरं दिली आहेत. एमएमआरमध्ये अंदाजे एक लाख इतकी घरे उपलब्ध करून देण्यासाठी गेल्या वर्षी निर्णय घेतला आहे. एकूण सात जागांवर गृहनिर्माण प्रकल्प उभारण्याचं ठरवलं आहे. गिरणी कामगारांना परवडणारी घरे योजनेतून घरे उपलब्ध करून देणार आहेत. त्यासाठी नियमात बदलही केले जातील, अशी ग्वाहीही शिंदेंनी दिली.

### धारावीचा पुनर्विकास हे आमचे वचन

धारावीचा पुनर्विकास हे आमचं वचन आहे. या पुनर्विकासामुळे मुंबईचे नाही तर, देशाचं नाव जगात मोठं होईल. धारावी ही आशिया खंडातील सर्वात मोठी झोपडपट्टी नाही तर जगातला सर्वात मोठा पुनर्विकासाचा गृहनिर्माण प्रकल्प अशी ओळख होणार आहे. या प्रकल्पामुळे धारावीकरांचं जीवनच बदलून जाणार आहे. आम्ही धारावीतल्या प्रत्येकाचं पुनर्वसन करणार आहोत. एकूण ७२ हजार कुटुंबांचं पुनर्वसन होणार आहे. हा पुनर्विकास फक्त पायाभूत सुविधांचा नाही, तर रोजगार, शिक्षण, आरोग्य, आणि सामाजिक सलोख्याचं मॉडेल ठरेल. हे 'स्मार्ट मुंबई'च्या दिशेने उचललेलं ऐतिहासिक पाऊल आहे.

### परवडणारी ३५ लाख घरे बांधणार

परवडणाऱ्या घरांसाठी नवीन गृहनिर्माण धोरण तयार केलं असून ७० हजार कोटींची गुंतवणूक करून ३५ लाख घरे बांधणार आहोत. सर्वसामान्यांना हक्काची परवडणारी, पर्यावरणपूरक घरे मिळणार आहेत. मुंबईतील जुन्या इमारतींच्या पुनर्विकासाचा प्रश्नही खूप मोठा आहे. मी मुख्यमंत्री असताना बृहन्मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ मध्ये (अधिनियम १९७६) सुधारणा केल्या आणि त्यामुळे आता अर्धवट सोडलेले प्रकल्प झपाट्याने पूर्ण करता येणार आहेत. रखडलेल्या एसआरएच्या योजना सरकारी संस्थांच्या माध्यमातून पूर्ण होऊन ४० लाख झोपडपट्टीवासियांना घर देण्याचं हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचं स्वप्न प्रत्यक्षात आणत असल्याचे उपमुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी स्पष्ट केले.

Deputy CM Eknath Shinde announced plans to build 3 lakh affordable homes in Mumbai, rehabilitating 3,000 families and reviving Marathi residents. The redevelopment aims for infrastructure, employment, education, and health improvements. Key projects include Dharavi, Goregaon, Kamathipura, and BDD chawls, driving Mumbai towards a 'Smart Mumbai.'

Nav Rashtra • 18 Jul • Dharavi

## Mumbaikars who have left will be brought back

| 7 • PG | 257 • Sqcm | 423897 • AVE | 500.5K • Cir | Top Left |
|---|---|---|---|---|

Mumbai



परवडणारी ३५ लाख घरे बांधण्याचा राज्य सरकारचा संकल्प-उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

# बाहेर गेलेल्या मुंबईकराला परत आणणार

मुंबई, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. मुंबईतला मुंबईकर सध्या शहराबाहेर फेकला गेला आहे. या सर्वसामान्य मुंबईकराचे घरांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी गेल्या अनेक वर्षांपासूनचे अडथळे दूर करीत मुंबईबाहेर गेलेल्या मराठी माणसांना परत आणण्याचे काम आम्ही करत आहोत. याशिवाय महायुती सरकारने केलेल्या प्रयत्नांमुळे देशाचे ग्रोथ इंजिन असलेल्या मुंबईतील नागरिकांच्या जीवनात आमुलाग्र बदल होईल. नगरविकास आणि गृहनिर्माण विभागातील आवश्यक त्या सुधारणांमुळे रखडलेले पुनर्विकास प्रकल्प पूर्ण होतील तसेच झोपडपट्टीमुक्त मुंबईच्या दिशेने वाटचाल होईल, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधानसभेत दिली.

विधानसभेत नियम २९३ अन्वये झालेल्या चर्चेला उत्तर देताना उपमुख्यमंत्री शिंदे बोलत होते. शिंदे म्हणाले, मुंबईचा मेकओव्हर खऱ्या अर्थाने आम्ही करतोय. मुंबईसाठी सर्वाधिक काम महायुतीने केलंय.

### वरळीमध्ये ५५६ सदनिकांचे वाटप १५ ऑगस्टपर्यंत

मुंबईतील रखडलेल्या पुनर्विकास प्रकल्पांना गती देण्याचे काम आम्ही करीत आहोत. यामध्ये मोतीलाल नगर गोरेगाव, जीटीपी नगर येथे समुह विकास प्रकल्पासाठी विकासकाची नेमणूक करण्यात आली आहे. यामुळे ४९०० रहिवाशांना घरे मिळणार आहेत. कामाठीपुरा अभ्युदयनगर इथल्या समुह विकासासाठी निविदा प्रक्रिया सुरू असून सप्टेंबर २०२५पर्यंत ती पूर्ण होईल. ११ हजार ४११ भाडेकरूंना पुनर्विकासाचा लाभ होणार आहे. आदर्शनगर वरळी आणि वांद्रे रिक्लेमेशन येथे क्लस्टरचा लाभ २०१० रहिवाशांना होणार आहे त्याचीही निविदा प्रक्रिया सुरू आहे. वरळी नायगाव आणि ना.म. जोशी मार्ग येथे बीडीडी चाळींचा पुनर्विकास प्रकल्प सुरू आहे.

० २५ टक्के सदनिकांचे वाटप डिसेंबर २०२५ पर्यंत

### गिरणी कामगारांच्या घरांसाठी हौसिंग स्टॉक वाढवणार

गिरणी कामगारांनी मुंबईच्या विकासासाठी मोठा त्याग केला आहे. आम्ही गिरणी कामगारांना मुंबईलगत घरे बांधून देणार आहोत. मुंबई बाहेर गेलेल्या गिरणी कामगारांना आम्ही मुंबईत आणतोय. गिरणी कामगारांचे सर्वेक्षण करण्यासाठी आम्ही अॅप तयार केले. मुंबईतल्या आजारी, बंद पडलेल्या गिरण्यांमधल्या १ लाख ७४ हजार १७२ गिरणी कामगारांची नोंद झाली.यापैकी २८ गिरण्यांच्या जागांवर बांधकाम पूर्ण करून घरांच्या सोडती चार टप्प्यात म्हाडाकडून काढण्यात आल्या आहेत. आतापर्यंत १३ हजार १६१ गिरणी कामगारांना घरं दिली आहेत.एमएमआरमध्ये अंदाजे एक लाख इतकी घरे उपलब्ध करून देण्यासाठी गेल्या वर्षी निर्णय घेतला आहे. एकूण सात जागांवर गृहनिर्माण प्रकल्प उभारण्याचं ठरवलं आहे. गिरणी कामगारांना परवडणारी घरे योजनेतून घरे उपलब्ध करून देणार आहोत. त्यासाठी नियमात बदलही केले जातील, अशी ग्वाहीही शिंदेंनी दिली.

४९०० रहिवाशांना मिळणार घरे

११४११ भाडेकरूंना पुनर्विकासाचा लाभ

- वरळी, वांद्रे रिक्लेमेशन येथे २०१० रहिवाशांना क्लस्टरचा लाभ
- वरळी, नायगाव आणि ना.म. जोशी मार्ग येथे बीडीडी चाळींचा पुनर्विकास

### धारावीचा पुनर्विकास हे आमचे वचन

धारावीचा पुनर्विकास हे आमचं वचन आहे.या पुनर्विकासामुळे मुंबईचे नाही तर, देशाचं नाव जगात मोठं होईल. धारावी ही आशिया खंडातील सर्वात मोठी झोपडपट्टी नाही तर जगातला सर्वात मोठा पुनर्विकासाचा गृहनिर्माण प्रकल्प अशी ओळख होणार आहे. या प्रकल्पामुळे धारावीकरांचं जीवनच बदलून जाणार आहे.आम्ही धारावीतल्या प्रत्येकाचं पुनर्वसन करणार आहोत. एकूण ७२ हजार कुटुंबांचं पुनर्वसन होणार आहे. हा पुनर्विकास फक्त पायाभूत सुविधांचा नाही, तर रोजगार, शिक्षण, आरोग्य, आणि सामाजिक सलोख्याचं मॉडेल ठरेल. हे 'स्मार्ट मुंबई'च्या दिशेनं उचललेलं ऐतिहासिक पाऊल आहे.

### परवडणारी ३५ लाख घरे बांधणार

परवडणाऱ्या घरांसाठी नवीन गृहनिर्माण धोरण तयार केलं असून ७० हजार कोटींची गुंतवणूक करून ३५ लाख घरे बांधणार आहोत. सर्वसामान्यांना हक्काची परवडणारी, पर्यावरणपूरक घरे मिळणार आहेत. मुंबईतील जुन्या इमारतींच्या पुनर्विकासाचा प्रश्नही खूप मोठा आहे. मी मुख्यमंत्री असताना बृहन्मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ मध्ये (अधिनियम १९७६) सुधारणा केल्या आणि त्यामुळे आता अर्धवट सोडलेले प्रकल्प झपाट्याने पूर्ण करता येणार आहेत. रखडलेल्या एसआरएच्या योजना सरकारी संस्थांच्या माध्यमातून पूर्ण होऊन ४० लाख झोपडपट्टीवासियांना घरं देण्याचं हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचं स्वप्न प्रत्यक्षात आणत असल्याचे उपमुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी स्पष्ट केले.

Deputy CM Eknath Shinde announced that Mumbai's major redevelopment projects, including Asia’s largest Dharavi project, will rehabilitate 3,000 families and boost housing, employment, and health. Efforts include BDD chawl revamp, mill worker housing, and 5 lakh new homes to transform Mumbai into a slum-free, modern, and livable city.

Prahar • 18 Jul • Dharavi

## Mumbai's makeover

| 7 • PG | 113 • Sqcm | 38573 • AVE | 215K • Cir | Top Left |
|---|---|---|---|---|

Mumbai

# मुंबईचा मेकओव्हर

मुंबई ही महाराष्ट्राची राजधानी असली तरी देशाची आजही आर्थिक राजधानी आहे. देशाच्या कानाकोपऱ्यातून रोजगारासाठी हजारोंच्या संख्येने लोंढे या नगरीत येतात आणि स्थिरावतात. हे आजचे चित्र नसून सुरुवातीपासूनच हे चित्र पाहावयास मिळत आहे. मुंबईत आलेला माणूस कधीही उपाशी मरत नाही. येथे येणाऱ्या प्रत्येक हाताला रोजगार हा मिळतोच, असे मुंबईविषयी देशभरात सांगितले जाते. अर्थात शहरांमध्ये लोकसंख्या किती सामावली जावी, यालाही मर्यादा असतात. रोजगारावर मर्यादा निर्माण होतात. रोजगार मिळेनासे झाले, की पोटापाण्यासाठी इतरत्र हातपाय मारणे हे ओघाने आलेच. त्यातूनच पुणे, पिंपरी, नाशिक, नागपूर, औरंगाबाद ही शहरे औद्योगिकदृष्ट्या मागील दोन दशकांमध्ये विकसित झाली आहेत, नावारूपाला आली आहेत. रोजगारासाठी आलेल्या नागरिकांच्या निवासाची सोय करावीच लागते. रोजगार उपलब्ध होत असला तरी इमारतींमध्ये राहण्याजोगे उत्पन्न नसल्याने चाळी, झोपड्यांची उभारणी करणे व त्यात वास्तव्य करणे, हे प्रकार वाढीस लागले. त्यातूनच मुंबई शहर, उपनगरांमध्ये चाळी, झोपड्या वाढीस लागल्या. निवासी परिसर निर्माण झाल्यावर त्या ठिकाणी नागरी सुविधा उपलब्ध करून देणे, तेथील नागरी समस्या सोडविणे ही जबाबदारी महापालिका प्रशासनाला पार पाडावी लागते. झोपड्या व चाळींमध्ये गटारे, नाले वाढत गेले. वाढत्या लोकसंख्येमुळे शहर विस्तारत गेले. एकेकाळी मुंबई ही सायन, बोरिवली, मानखुर्दपर्यंत विस्तारली होती; परंतु आता शहरीकरण व नागरीकरण फोफावल्याने खोपोली, पनवेल, उरण, कर्जत, कसारा, विरारपर्यंत चाळी, झोपड्या पाहावयास मिळतात. सरकारी जागांवर झोपड्यांनी, चाळींनी अतिक्रमण केल्याने नागरी सुविधांसाठी भूखंड कमी होत गेले. खेळण्यासाठी मैदाने शिल्लक राहिली नाहीत. महापालिकेच्या अतिक्रमण विभागाने उदासीनता दाखविल्याने मुंबई शहर व उपनगरांमध्ये अतिक्रमणे फोफावली. त्या-त्या काळातील राज्यकर्त्यांनी हक्काच्या मतांची बेगमी करताना अनधिकृत बांधकामे अधिकृत करण्याचा निर्णय घेतल्याने या अतिक्रमणांना कायदेशीर राजमान्यता मिळाली. अतिक्रमणांवर अधिकृततेचे शिक्कामोर्तब झाल्यावर पाणी, रस्ते, पायवाटा, शौचालये या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी महापालिका प्रशासनाला तारेवरची कसरत करावी लागली. त्यातून मुंबई शहर, उपनगराला बकालपणा आला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारने मुंबईचा 'मेकओव्हर' करण्याचा निर्णय घेतला असून त्यासाठी मंत्रालयीन पातळीवर हालचालीही सुरू झाल्या आहेत. अर्थात यापूर्वीच्याही राज्य सरकारांनी तसे काही प्रमाणात प्रयत्न केले होते. पण काहींच्या प्रयत्नांना गती मिळाली नाही, काहींचे प्रयत्न कागदोपत्रीच राहिले. त्यामुळे, मुंबई शहर व उपनगरांवरील बकालपणाची ओळख पुसण्यात कोणालाही यश मिळाले नाही. 'झोपडपट्टी हटाव'च्या घोषणा झाल्या, मते मिळाली. सरकारे आली-गेली. पण झोपडपट्टी आजही कायमच आहे. झोपडपट्ट्या, चाळी हटविल्याशिवाय आणि त्या जागी इमारती उभ्या राहिल्याशिवाय मुंबईचा बकालपणा कमी होणार नाही, शहर स्वच्छतेला गती मिळणार नाही, हे ओळखून झोपड्या व चाळी हटविण्याचे मंत्रालयीन पातळीवर अनेकदा नियोजन करण्यात आले. १९९५ साली सत्तेवर असलेल्या शिवसेना-भाजप सरकारनेही निवडणूक प्रचारामध्ये '४० लाख झोपडपट्टीवासीयांचे पुनर्वसन' ही घोषणा देऊन मतदान वळवून घेतले. काही प्रमाणावर मुंबईमध्ये रेल्वे स्टेशनजवळील झोपड्या हटवून तिथे सात मजली इमारतीही बांधण्यात आल्या. झोपडपट्टीधारकांचे इमारतीत राहण्याचे स्वप्न साकार झाले. पण हे चित्र एक-दोन ठिकाणीच पाहावयास मिळाले. या झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पाला गती मिळालीच नाही. मुंबईतीलच नव्हे; तर आशिया खंडातील सर्वाधिक मोठी झोपडपट्टी म्हणून धारावीचा उल्लेख होतो. या धारावीचा कायापालट अदानी उद्योगसमूहाच्या माध्यमातून होत आहे. धारावीचा कायापालट झाल्यास मुंबई शहरावरील बकालपणाचा डाग बऱ्याच अंशी कमी होईल. धारावीच्या पुनर्विकासातून ७२ हजार कुटुंबांचे पुनर्वसन होणार आहे. बीडीडी चाळींचा उल्लेख एकेकाळी 'कोंबड्यांचे खुराडे' असा केला जायचा. पण आता त्याच ठिकाणी टोलेजंग टॉवर उभे राहत आहेत. चाळी, झोपड्यांचा क्लस्टरच्या नावाखाली कायापालट होऊ लागला आहे. पुनर्विकासाच्या कामांना गती मिळू लागली आहे.

मुंबईतील रखडलेल्या पुनर्विकास प्रकल्पांना गती देण्याचे काम महायुती सरकारकडून सुरू झाले. यामध्ये मोतीलाल नगर गोरेगाव, जीटीबी नगर येथे समूह विकास प्रकल्पासाठी विकासकाची नेमणूक करण्यात आली. ४ हजार ९०० रहिवाशांना यामुळे घरे मिळणार आहेत. कामाठीपुरा, अभ्युदयनगर इथल्या समूह विकासासाठी निविदा प्रक्रिया सुरू असून सप्टेंबर २०२५पर्यंत ती पूर्ण होईल. ११ हजार ४११ भाडेकरूंना पुनर्विकासाचा लाभ होईल. आदर्शनगर वरळी आणि वांद्रे रिक्लेमेशन येथे क्लस्टरचा लाभ २०१० रहिवाशांना मिळणार आहे. त्याचीही निविदा प्रक्रिया सुरू आहे. नायगाव, वरळी आणि ना. म. जोशी मार्ग येथे बीडीडी चाळींचा पुनर्विकास सुरू आहे. त्यामध्ये एकूण १५ हजार ६०० भाडेकरूंचे पुनर्वसन होणार आहे. त्यापैकी वरळीमध्ये ५५६ सदनिकांचे वाटप १५ ऑगस्टपर्यंत करण्याचा महायुतीचा संकल्प आहे. मुंबईत परवडणाऱ्या घरांसाठी नवीन गृहनिर्माण धोरण तयार करण्यात आले असून ७० हजार कोटींची गुंतवणूक करून ३५ लाख घरे बांधण्यात येणार आहेत. सर्वसामान्यांना हक्काची, परवडणारी, पर्यावरणपूरक घरे मिळणार आहेत. मुंबईतील जुन्या इमारतींच्या पुनर्विकासाचा प्रश्नही खूप मोठा आहे. रखडलेल्या एसआरएच्या योजना सरकारी संस्थांच्या माध्यमातून पूर्ण होऊन ४० लाख झोपडपट्टीवासीयांना घरे देण्याचे हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचे स्वप्न महायुती सरकारच्या प्रयत्नांमुळे प्रत्यक्षात येणार आहे. अर्थात दिल्ली दूर है. मुंबईच्या 'मेकओव्हर'च्या प्रयत्नांना सुरुवात झाली. त्यात सातत्य हवे. राज्यकर्त्यांची इच्छा प्रबळ असल्यास या गोष्टी अशक्य नाहीत. प्रशासनाच्या प्रयत्नांना राजकीय अडथळे न आल्यास येत्या काळात मुंबईचा चेहरामोहरा बऱ्यापैकी बदलेल, अशी आशा बाळगायला हरकत नाही.

Mumbai is undergoing a major makeover, with redevelopment projects like Dharavi, BDD chawls, and cluster housing gaining momentum. The government aims to provide affordable housing, rehabilitate slum dwellers, and improve civic infrastructure. With strong political will, Mumbai is steadily transforming into a modern, inclusive city.

Mumbai Tarun Bharat • 18 Jul • Dharavi

# Symbiosis' ready for skill development of students in Dharavi

| 7 • PG | 123 • Sqcm | 15385 • AVE | 17.73K • Cir | Bottom Right |
|---|---|---|---|---|

Mumbai



# धारावीतील विद्यार्थ्यांच्या कौशल्य विकासासाठी 'सिम्बायोसिस' सज्ज

## 'एनएमडीपीएल'च्या मदतीने रोजगाराभिमुख प्रशिक्षणाचा नवा अध्याय सुरू

**मुंबई, दि. १७ : प्रतिनिधी**

धारावीतील तरुणांना मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या हेतूने कौशल्य प्रशिक्षणाचा 'नवा अध्याय' धारावीत सुरू झाला आहे. 'सिम्बायोसिस मुक्त शिक्षण सोसायटी' आणि 'नवभारत मेगा डेव्हलपर्स प्रा. लि.' (एनएमडीपीएल) यांच्या भागीदारीतून सुरू करण्यात आलेल्या या विशेष उपक्रमामुळे धारावीतील पदवीधर आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना कौशल्य प्रशिक्षणाची सुवर्णसंधी उपलब्ध होणार आहे.

'सिम्बायोसिस कौशल्य आणि व्यवसाय विद्यापीठा'च्यावतीने धारावीतील पदवीधर आणि पदव्युत्तर पदवीधारकांसाठी चार महिने कालावधीचा विशेष अभ्यासक्रम तयार करण्यात आला आहे. या अभ्यासक्रमामध्ये 'बीएफएसआय', 'रिटेल', 'लॉजिस्टिक', 'हेल्थकेअर', 'समुपदेशन आणि उत्पादन' अशा मागणी असलेल्या विविध क्षेत्रांचा समावेश करण्यात आला आहे. प्रशिक्षणादरम्यान विद्यार्थ्यांना 'फायनान्शियल ॲनालिस्ट', 'बिझनेस ॲनालिस्ट', 'एचआर एक्झिक्युटिव्ह', 'लॉजिस्टिक कोऑर्डिनेटर' अशा नोकऱ्यांसाठी तयार केले जाईल. मे महिन्यात 'सिम्बायोसिस' आणि 'एनएमडीपीएल' यांच्यामध्ये झालेल्या सामंजस्य करारातून या कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रमाची सुरुवात झाली.

'फायनान्शियल ॲनालिस्ट' अभ्यासक्रमाच्या दोन तुकड्या 'एनएमडीपीएल'च्या 'धारावी रिसोर्स सेंटर' येथे सुरू करण्यात आल्या आहेत. यामध्ये एकूण ४६ विद्यार्थी असून विशेष म्हणजे विद्यार्थिनींचे प्रमाण ६० टक्क्यांहून अधिक आहे. या उपक्रमात अभ्यासक्रमासह प्रत्यक्ष प्रशिक्षणासाठी आवश्यक असलेले अनुभवी प्रशिक्षक, लर्निंग लॅब्स अशा पायाभूत सुविधाही 'सिम्बायोसिस'कडून पुरवण्यात येत आहेत. तसेच, नोकरी मिळवण्यासाठी मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

''रेशोन ॲनालिसिस', 'टाईम व्हॅल्यू ऑफ मनी' अशा अनेक संकल्पना या अभ्यासक्रमात मला समजून घेता आल्या. भविष्यात याचा नक्कीच उपयोग होईल,'' अशी प्रतिक्रिया प्रशिक्षणार्थी अयान सिद्दिकी याने दिली. 'इन्शुरन्स ॲण्ड प्रेझेंटेशन स्किल्स' याबाबतच्या सत्रांमधून अनेक प्राथमिक संकल्पना डोक्यात स्पष्ट झाल्याचे सांगत सायली घोशे आणि दिया वाडेकर यांनी अभ्यासक्रमाबाबत समाधान व्यक्त केले.

> "'एनएमडीपीएल'सोबत आम्ही सुरू केलेला हा प्रवास म्हणजे धारावीतील तरुणांच्या उज्वल भविष्याच्या दिशेने टाकलेले पहिले पाऊल आहे. धारावीतील तरुणांना उद्योगाभिमुख कौशल्य प्रशिक्षण देऊन त्यांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी करण्याचा आमचा मानस आहे.
>
> – **राजेश खन्ना,** संचालक, सिम्बायोसिसचे बिझनेस ऑपरेशन्स

> "हा केवळ तात्पुरता उपक्रम नसून 'सिम्बायोसिस'च्या 'जी. सी. सी. एम्प्लॉयबिलिटी ॲण्ड स्किलिंग प्रोग्राम' अंतर्गत उचललेले महत्त्वपूर्ण पाऊल आहे. धारावीसारख्या वस्तीतल्या विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय दर्जाच्या कंपन्यांमध्ये रोजगार मिळवून देण्याच्या आमच्या व्हिजनचा हा एक भाग आहे.
>
> – **प्रवक्ता,** एनएमडीपीएल

With NMDPL's support, a new employment-focused skill training program has started in Dharavi. Symbiosis Free Education Society and NMDPL offer a four-month course for graduates in areas like Retail, Logistics, Healthcare, and more. This initiative aims to empower Dharavi youth with job-ready skills and career guidance.

Mumbai Tarun Bharat • 18 Jul • Dharavi

# If Dino opens his mouth, many will become 'Moriya'; Eknath Shinde attacks 'Ubatha

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1 • PG | 75 • Sqcm | 9389 • AVE | 17.73K • Cir | Middle Center |

Mumbai



# दिनोने तोंड उघडले, तर अनेकांचा 'मोरया' होईल; एकनाथ शिंदेंचा 'उबाठा'वर हल्ला

**मुंबई, दि. १७ : विशेष प्रतिनिधी**

''उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गुरुवारी विधानसभेत उबाठा गटाच्या भ्रष्टाचाराचा पाढा वाचला. दिनोने तोंड उघडले, तर अनेकांचा 'मोरया' होईल,'' असा इशाराही त्यांनी दिला. ''सिमेंट-काँक्रीट रस्त्यांना २५ वर्षे दुरुस्तीची गरज नसते, मग दरवर्षी दुरुस्तीच्या नावाखाली कोणी पैसे काढले? आम्ही रस्ते स्वच्छ केले, पण तुमच्या लोकांनी तिजोऱ्या धुतल्या. मिठी नदीतील गाळ काढण्याचे कंत्राट कोणत्या ठेकेदाराला दिले? तिथे मराठी माणूस दिसला नाही, पण 'दिनो मोरया' दिसला. त्याने तोंड उघडले, तर अनेकांचे बिंग फुटेल,'' असे ते म्हणाले.

विधानसभेत 'नियम २९३'अन्वये झालेल्या चर्चेला उत्तर देताना उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले, ''जो स्वतः काचेच्या घरात राहतो, तो दुसऱ्याच्या घरावर दगड मारत नाही. टेंडरच्या नावाखाली मुंबई विकणारे कोण? आत्मपरीक्षण करा,'' असा सल्ला त्यांनी ठाकरे गटाला दिला. मराठी भाषेला अभिजात दर्जा, विश्व मराठी संमेलन आणि मराठी माणसांसाठीच्या योजनांचा दाखला देत शिंदे यांनी महायुतीच्या कामगिरीचा पुनरुच्चार केला. ''आमचे काम बोलते, म्हणूनच महायुतीला जनतेने बहुमत दिले,'' असे ते म्हणाले. कोस्टल रोड, सिमेंट-काँक्रीट रस्ते, झोपडपट्टीमुक्त मुंबई आणि मराठी माणसांना परत आणण्याचे प्रयत्न यांचा उल्लेख करत त्यांनी महायुती सरकारच्या (पान ८ वर)»

## बाळासाहेबांचे स्वप्न आम्ही पूर्ण करणार

''रमाबाई आंबेडकर नगर येथे ६ हजार, १४४ झोपडीधारकांचे पुनर्वसन होत आहे. गिरणी कामगारांनी मुंबईच्या विकासासाठी त्याग केला. १ लाख, ७४ हजार, १७२ कामगारांची नोंद झाली असून १३ हजार, १६१ जणांना घरे दिली आहेत. एक लाख घरे उपलब्ध करू. धारावी पुनर्विकासामुळे मुंबईचे नाव जागतिक पातळीवर पोहोचेल. ७२ हजार कुटुंबांचे पुनर्वसन होईल. रोजगार, शिक्षण, आरोग्य आणि सामाजिक सलोख्याचे हे मॉडेल असेल. 'स्मार्ट मुंबई'च्या दिशेने हे ऐतिहासिक पाऊल आहे'', असे शिंदे यांनी सांगितले.

Deputy Chief Minister Eknath Shinde fiercely attacked the 'Ubatha' group in the Assembly, accusing them of corruption and favoring non-Marathi contractors. He warned, "If Dino opens his mouth, many will be 'Moraya.'" Shinde praised Mahayuti's work for Marathi pride and promised Dharavi's redevelopment would globally uplift Mumbai.

Navbharat Times • 18 Jul • Dharavi

## Symbiosis University. Partnership between DRP

| 2 • PG | 51 • Sqcm | 58106 • AVE | 380K • Cir | Bottom Left |
|---|---|---|---|---|

Mumbai

# सिंबायोसिस विवि. और DRP के बीच हुई साझेदारी



